Historicity Research Journal
Volume 1 | Issue 10 | June 2015 ISSN:- 2393-8900

**Research Article**

# कार्ले चैत्यगृहातील युगल प्रतिमा व अलंकाराचा अभ्यास

**सुनिल मधुकर पिसके**

Ph.D., संशोधक, प्रा.भा.इ.सं. आणि पुरातत्व शास्त्र, सामाजिक शास्त्रे संकुल,
सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

**स्थान :**

कार्ले लेणी या पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यात पुणे-मुंबई लोहमार्गावरील मळवली या स्टेशनपासून ५ कि.मी. अंतरावर आहेत. कार्ले लेणी १८°४६' उत्तर अक्षांसास ७३°२९' पूर्व रेखांशावर आहेत. (मित्रा देबला : १९७१; १५४) कार्ले हा एक १६ स्वतंत्र लेणींचा समुह असून यात एक चैत्यगृह, विहार व पाण्याची टाके यांचा समावेश होतो. या लेणी समुहापासून पश्चिमेस असणारे इंद्रायणी नदीचे खोरे दृष्टीक्षेपात येते. कार्ले लेणीपासून भाजे, बेडसे, शेलारवाडी व कोंढाणे ही लेणी जवळच असल्यामुळे प्राचीनकाळी या भागावर बौद्ध धर्मियांचे बरेच प्रस्त असावे असे वाटते.

कार्ले येथे असणारे क्र. ६ चे चैत्यगृह हे राजसी सौंदर्याने नटलेले असून खूप सफाईदार व सौंदर्यपूर्णरितीने खोदलेले आहे. या चैत्यगृहाच्या समोरील बाजूस असणाऱ्या ओवरीत, चैत्यगृहाच्या प्रवेशद्वाराच्या दर्शनी बाजूच्या भिंतीत, हत्ती, दंपत्तीशिल्प/युगलप्रतिभा व चैत्यगृहाच्या आतील बाजूस स्तंभशिखावर हत्ती, घोडे व सिंह या प्राण्यांवर बसलेली युगुले यांच्या प्रतिभा खोदलेल्या दिसतात. जेम्स फर्ग्युसन व जेम्स बर्जेस यांनी त्यांच्या The Cave Temple of India या पुस्तकात या युगुलप्रतिमा/दंपत्ती शिल्पांचा उल्लेख केलेला आहे.

**चैत्यगृहाच्या प्रवेशद्वाराच्या डाव्या बाजूच्या युगुल प्रतिमा :**

**युगल प्रतिमा क्र. १ (पद्मपाणी अवलेकितेश्वराच्या डाव्या बाजूची प्रतिमा)**



**पुरुष**-स्थानक, द्विभंग आहे.

या पुरुषाच्या डोक्यावर शिरोभुषण / फेटा असून त्यात तुरा खोवलेला दिसतो. चेहऱ्यावर स्मितहास्य आहे. केस लांब खांद्यापर्यंत रुळलेले दिसतात. गळ्यात खांद्यापर्यंत पसरट दागिना घातलेला असून त्यावर दोन फुलांची नक्षी दिसते. पुरुषाने त्याचा उजवा हात स्त्रीच्या उजव्या खांद्यावर ठेवलेला आहे. डावा हात कोपऱ्यात दुमडून वर धरलेला असून हातात पुष्प आहे. कमरेभोवती कटीवस्त्र परिधान केलेले असून कटीवस्त्राच्यावर आणखी एक जाड वस्त्र उजवीकडून डावीकडे गाठ मारुन बांधलेले दिसते. डावा पाय सरळ ठेवलेला असून उजवा पाय थोडासा तिरका ठेवलेला आहे.

**स्त्री -** स्थानक, द्विभंग आहे.

या स्त्रीने अगदी चोपून केशरचना केलेली दिसते. कपाळावर गोलाकार मोठ्या आकाराची बिंदी आहे. कानात मोठी गोलाकार कर्णफूले आहेत. गळ्यात पाच पदरी माळ घातलेली आहे. या स्त्रीने तिचा डावा हात कमरेवर ठेवलेला असून उजवा हात सरळ खाली सोडलेला आहे. डाव्या हातात कोपऱ्यापर्यंत कंकणे घातलेली दिसतात. कमरेभोवती कटीवस्त्र परिधान केलेले आहे. कमरेला मेखला घातलेला आहे. (कुरेशी दुलारी : २०१०; २५५) या स्त्रीच्या कमरेचा भाग पसरट आहे. या स्त्रीचा उजवा पाय सरळ ठेवलेला असून डावा पाय थोडासा पाठीमागे घेऊन तिरका ठेवलेला आहे. दोन्ही पायात मोठ्या आकाराचे तोडे घातलेले आहेत. या स्त्रीचा चेहरा लांब गोलाकार असून चेहऱ्यावर स्मितहास्य आहे.

**प्रतिमा क्र. २ (पद्मपाणी अवलोकिनेश्वर प्रतिमेच्या उजव्या बाजूस)**



**पुरुष -** स्थानक, द्विभंग आहे.

डोक्यावर शिरोभुषण / फेटा परिधान केलेला असून त्यात गोलाकार तुरा खोवलेला आहे. चेहरा लंबगोलाकार असून चेहऱ्यावर स्मितहास्य आहे. केस खांद्यापर्यंत रुळलेले आहेत. कानात कर्णाभूषणे घातलेली आहेत. खांदे पसरट आहेत. उजवा हात सरळ खाली सोडलेला असून हातात कटीवस्त्राच्या सोंग्याचा एक पदर धरलेला आहे. डावा हात कोपऱ्यात दुमडून वर धरलेला असून हातात पुष्पगुच्छ आहे. दोन्ही हातात दोन गोलाकार साधे व एक मण्यांचे कंकण घातलेले आहे. कमरेभोवती कटीवस्त्र परिधान केलेले असून कटीवस्त्राचा सोंगाखाली पायापर्यंत लोळत असलेला दिसतो. या कटीवस्त्राच्या वर आणखी एक जाड वस्त्र उजवीकडून डावीकडे गाठ बांधून घातले आहे. दोन्ही पाय तिरके ठेवलेले दिसतात. कमरेभोवती परिधान केलेल्या वस्त्राच्या घड्या खुप सुंदररितीने खोदलेल्या दिसतात.

**स्त्री -** स्थानक, द्विभंग आहे.

या स्त्री चा चेहरा लंबगोलाकार असून चेहऱ्यावर स्मितहास्य आहे. या स्त्रीने केसांच्या बटा बांधून केशरचना केलेली आहे. कपाळावर गोलाकार मोठ्या आकाराची बिंदी आहे. कानात मोठी गोलाकार कर्णफुले घातलेली आहेत. गळ्यात फुलांची नक्षी असणारी माळ घातलेली असून या माळेस मधोमध फुलांच्या आकाराचे (गोलाकार) पदक असून या पदकास फुलांची नक्षी असणारे दोन लोलक दिसतात. (कुरेशी, दुलारी : २०१०; २५६) या स्त्रीने तिचे दोन्ही हात डोक्याच्यावर धरलेले असून हात जोडलेले आहेत. दोन्ही हातात कोपऱ्यापर्यंत कंकणे घातलेली दिसतात. कमरेभोवती कटीवस्त्र परिधान केलेले असून मेखला आहे. उजवा पाय डाव्या पायाच्या पुढे हाच वर करुन ठेवलेला दिसतो. (गुडघ्यापासून पाय नष्ट झालेला आहे.) डाव्या पायात मोठ्या आकाराचा तोडा घातलेला आहे.

**प्रतिमा क्र. ३ (चैत्यगृहाच्या प्रवेशद्वाराच्या उजव्या बाजूची पहिली)**



**पुरुष -** स्थानक, द्विभंग आहे.

या पुरुषाचा चेहरा लंबगोलाकार असून चेहऱ्यावर स्मितहास्य आहे. डोक्यावर शिषोभुषण / फेटा परिधान केलेला असून त्यात गोलाकार तुरा खोवलेला दिसतो. केस खांद्यापर्यंत रुळलेले दिसतात. खांदे पसरट व मजबुत दिसतात. या पुरुषाने त्याचा उजवा हात स्त्रीच्या उजव्या खांद्यावर ठेवलेला आहे तर डावा हात सरळ खाली सोडलेला असून हातात कटीवस्त्राच्या सोंग्याचा एक पदर धरलेला आहे. डाव्या हातात गोलाकार मण्यांची चार कंकणे घातलेली दिसतात. कमरेभोवती कटीवस्त्र परिधान केलेले असून कटीवस्त्रांचा सोंगाखाली पायापर्यंत लोंबकळत असलेला दिसतो. या कटीवस्त्राच्यावर आणखी एक गोलाकार जाड वस्त्र बांधलेले दिसते. उजवा पाय सरळ ठेवलेला आहे तर डावा पाय तिरका करुन उजवीकडे ठेवलेला दिसतो. या पुरुषाचे शरीर अगदी धष्ट-पुष्ट आहे.

**स्त्री -** स्थानक, द्विभंग आहे.

या स्त्रीचा चेहरा लंबगोलाकार असून चेहऱ्यावर स्मितहास्य आहे. कपाळावर गोलाकार मोठ्या आकाराची बिंदी आहे. कानातही मोठी गोलाकार कर्णफुले घातलेली दिसतात. या स्त्रीने तिचा उजवा हात कमेवर ठेवलेला आहे. (सध्या हा हात नष्ट झालेला आहे) तर डावा हात पुरुषाच्या पाठीमागे ठेवलेला आहे. कमरेभोवती कटीवस्त्र परिधान केलेले असून मेखला घातलेला आहे. डावा पाय, बोटे जमिनीला टेकवून टाच वर करुन ठेवलेला आहे तर उजवा पाय डाव्या पायाच्या समोर ठेवलेला आहे. दोन्ही पायात मोठ्या आकाराचे तोडे घातलेले दिसतात. या स्त्रीच्या कमरेचा भाग पसरट दिसतो.

**प्रतिमा क्र. ४ (ओवरीतील उजव्या बाजूच्या अगदी डावीकडील हत्तीच्या बाजूस)**

**पुरुष - स्थानक, द्विभंग आहे.**

या पुरुषाच्या डोक्यावर शिरोभुषण / फेटा असून त्यात तुरा खोवलेला दिसतो. चेहऱ्यावर स्मितहास्य आहे. उजवा हात स्त्रीच्या उजव्या बाजूस कमरेवर ठेवलेला आहे. डाव्या हातात गोलाकार मण्यांची कंकणे घातलेली आहेत. कमरेभोवती कटीवस्त्र परिधान केलेले असून त्याचा सोंगा खाली पायापर्यंत लोळत असलेला दिसतो. या कटीवस्त्राच्या वर आणखी एक गोलाकार जाड वस्त्र उजवीकडून डावीकडे गाठ बांधून घातलेले दिसते. उजवा पाय सरळ ठेवला असून डावा पाय गुडघ्यात वाकवून तिरका ठेवलेला दिसतो.

**स्त्री - स्थानक, द्विभंग आहे.**

या स्त्रीचा चेहरा लंबगोलाकार असून चेहऱ्यावर स्मितहास्य आहे. कपाळावर मोठी गोलाकार बिंदी आहे. कानात कर्णफुले घातलेली दिसतात. गळ्यात गोलाकार मण्यांची माळ घातलेली असून या माळेच्या मधोमध एक मोठा चौकोनी मणी आहे. या स्त्रीने तिचा उजवा हात डोक्याच्या पाठीमागे धरलेला असून हातात कोपऱ्यापर्यंत कंकणे घातलेली दिसतात. कोपऱ्याजवळ एक गोठच्या आकाराचे मोठे कंकण घातलेले दिसते. डावा हात पुरुषाच्या डाव्या खांद्यावर ठेवलेला आहे. या स्त्रीच्या कमरेचा भाग पसरट दिसतो. कमरेभोवती कटीवस्त्र परिधान केलेले असून मेखला आहे. उजवा पाय डावीकडे घेतला असून डावा पाय उजव्या पायाच्या पुढे उजव्या बाजूस ठेवलेला दिसतो. दोन्ही पायात दोन-दोन मोठ्या आकाराचे तोडे घातलेले दिसतात.

त्याप्रमाणे चैत्यगृहातील स्तंभशिर्षावरील हत्ती, घोडे व सिंह या प्राण्यांवर बसलेल्या युगुल प्रतिमा खोदलेल्या आहेत. या प्रतिमांतील पुरुषाच्या डोक्यावर शिरोभुषण / फेटा त्यात तुरा खोवलेला आहे. केस मानेपर्यंत आलेले दिसतात. कानात कर्णाभुषणे, हातात कंकणे कमरेभोवती कटीवस्त्र परिधान केलेले दिसते. या युगुल प्रतिमा मधील स्त्रीयांनी वेगवेगळ्या प्रकारच्या केशरचना केलेल्या दिसतात. प्रत्येक स्त्रीच्या कपाळावर मोठ्या आकाराची गोलाकार बिंदी, कानात कर्णाभुषणे, गळ्यात वेगवेगळ्या पध्दतीच्या माळा घातलेल्या दिसता. हातात कंकणे घातलेली दिसतात. कमरेभोवती कटीवस्त्र परिधान केलेले दिसते.

**अलंकार :**

कार्ले येथील युगुल प्रतिमांमधील सर्व स्त्री प्रतिमांच्या कपाळावर मोठी गोलाकार बिंदी आहे. या स्त्रीयांच्या कानात वेगवेगळ्या प्रकारची मोठी गोलाकार कर्णाभुषणे घातलेली दिसतात. गळ्यात परिधान करण्याच्या माळाही एक ते चार-पाच पदरी आहेत. काही माळांच्या मध्ये चौकोनी मणी दिसतो. या स्त्री प्रतिमांच्या हातात साधी गोलाकार, गोल मण्यांची व मोठी गोठच्या आकाराची कंकणे घातलेली दिसतात. कमरेच्या मेखल्याचेही विविध प्रकार आढळतात. या स्त्रियांच्या कमरेला साधा मेखला, गोला आकाराच्या पट्टीप्रमाणे तर काही शिल्पांवर लोंबते मुक्तबंद आकाराचे आहे. येथील प्रत्येक स्त्रीने पायात मोठ्या आकाराचे तोडे घातलेले दिसतात. काही स्त्रीयांच्या पायात मोठ्या आकाराचे दोन तोडे दिसतात.

येथील शिल्पातील पुरुषाच्या डोक्यावर शिरोभुषण / फेटा असून त्यात वेगवेगळ्या प्रकारचे तुरे खोवलेले दिसतात. काही पुरुषांच्या गळ्यात खांद्यापर्यंत पसरट मोठा दागिना घातलेला दिसतो. कानात कर्णाभुषणे घातलेली दिसतात. पुरुष प्रतिमांच्या हातात साधे गोल, गोलाकार मण्यांची कंकणे दिसतात.

**निष्कर्ष :**

कार्ले येथील चैत्यगृहातील युगल प्रतिमा / दंपती शिल्पातील अलंकाराचा अभ्यास करताना असे लक्षात येते की, या कालखंडातील पुरुषांनाही अलंकार परिधान करण्याची आवड असावी. याठिकाणी असलेली सर्व युगुले शरीराने पुष्ट, भरभक्कम व थोडी स्थुलत्वाकडे झुकलेली आहेत. ज्या पद्धीने ही शिल्पे कोरलेली आहेत त्यावरून असे वाटते की, ही शिल्पे कोरणाऱ्या कलाकारांना शरीर सौंदर्याचे चांगले ज्ञान असावे. या शिल्पांमधील प्रत्येक स्त्रीने कपाळावर मोठ्या आकाराची बिंदी व हातात कोपऱ्यापर्यंत कंकणे घातलेली असून ती त्याकाळातील चाल/रीत असावे असे वाटते. कार्ले येथील चैत्यगृह खोदण्यासाठी अनेक व्यापारी लोकांनी मोठ्या प्रमाणात दान

दिल्याचे येथे असणाऱ्या शिलालेखांमध्ये नमूद केलेले आहेत. यावरून असे स्पष्ट होते की, या काळात समाजात सामाजिक स्थैर्य होते. व्यापाराची मोठ्या प्रमाणात भरभराट झालेली होती. तसेच समाजात आर्थिक संपन्नता असावी.

**संदर्भ :**

१. *स्वः सर्वेक्षण*
२. *Fergusson - Jams & Burgess - The Caves Temples of India (१९८८)*
३. *Nagaraju S. - Buddhist Architecture of western India १९८०*
४. *Qureshi Dulari - The Rock cut Temples of Western India, २०१०.*



**सुनिल मधुकर पिसके**
Ph.D., संशोधक, प्रा.भा.इ.सं. आणि पुरातत्व शास्त्र, सामाजिक शास्त्रे संकुल, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.